# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर

## प्रेस नोट दि.१६/१०/२०१८

## दि.१५/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे ३५८/१८,भादविक १४३,१४८,१४९,३२४,४२७,मु.पो.अधिनियम कलम ३७(१) सह १३५ |
| **फिर्यादी** | सुधीर कचरावत,वय-२५ वर्षे,रा.सर्व्हे नं.४५, बालाजी कॉलनी,विठ्ठलनगर,पुणे |
| **आरोपी** | एकुण सात इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१४/१०/२०१८ रोजी २०/३० वा.चे सुमारास म्हाडा वसाहती जवळ,वारजे माळवाडी येथे शशिकांत बाळगे यांना भाडेतत्वावर दिलेल्या शेड मध्ये |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी तोंडावर काळे फडके बांधुन नमुद ठिकाणी बेकायदेशीर जमाव जमवुन आरडा-ओरडा करून त्यांचे हातामध्ये कोयते घेवुन फिर्यादीस मारहाण करून त्यांना जखमी केले. सदर झटापटी मध्ये फिर्यादी यांचे ताब्यातील ११,०००/- रू रोख पडुन गहाळ झाले आहे. तसेच गबरू राठोड यांचे घरावर दगडफेक करून,त्यांचे दारातील पाणी भरण्याच्या प्लास्टीकच्या बादल्या कोयत्याने फोडुन,सदर ठिकाणी दहशत पसरवुन,सार्वजनिक शांततेचा भंग केला आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पी.एस.गायकवाड ९०९६७५५४०५ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चतुःश्रृंगी पो स्टे ५०२/१८,भादविक ३५३,५०४,१८६,३४ |
| **फिर्यादी** | शशिकांत सपकाळ, पो.ना. चतुःश्रृंगी वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | १.सारंग शेलैंद्र चौधरी,वय-२१ वर्षे,रा.लोहगाव,पुणे २.विभोर नरेशपाल तोमर,वय-२० वर्षे,रा. लोहगांव पुणे ३.रामेश्वर अरविंदकुमार सिंग,वय-२० वर्षे,रा.लोहगांव पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१०/२०१८ रोजी १९/३० ते २०/४५ वा. चे दरम्यान चतुःश्रृंगी वाहतुक विभाग,कार्यालय पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे चतुःश्रृंगी वाहतुक विभाग,पुणे शहर येथे ठाणे अमंलदार म्हणुन सरकारी कर्तव्य बजावित असताना,यातील नमुद इसमांनी त्यांचे मित्र जतीन रविंद्रकुमार सैनी याचेवर कारवाई केल्याचा राग मनात धरून,फिर्यादी यांचेशी हुज्जत घालुन,त्यांना अपशब्द वापरून, त्यांचेबरोबर झटापटी करून, ते करीत असलेल्या सरकारी कामात अडथळा आणला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.डी.धराडे ९४२०६६७७८९ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे ११७३/१८,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | चेतन रेवी,वय-३६ वर्षे,रा.गाडीतळ हडपसर,पुणे |
| **आरोपी** | अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१५/१०/२०१८ रोजी ११/५० वा.कामधेनु इस्टेट शेजारुन उषा किरण हॉस्पीटलकडे जाणारे रोडवर |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे खात्यावरील ५०,०००/- रुपये रोख रक्कम बँक ऑफ महाराष्ट्र शाखा हडपसर,पुणे येथुन काढुन,त्यांचेजवळ असलेल्या काळ्या रंगाचे सॅक मध्ये ठेवुन त्यांचे राहते घरी जाण्यासाठी कामधेनु इस्टेट शेजारुन उषा किरण हॉस्पीटलकडे जाणारे रोडवर आले असता,एका अनोळखी इसमाने फिर्यादी यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांना तुमचे कपड्या वर घाण पडलेली आहे असे सांगुन,त्यांचे लक्ष विचलीत करुन,फिर्यादी यांचे एका काळ्या रंगाचे सॅक मध्ये ठेवलेली रोख ५० हजार रूपये रक्कम सॅकसह चोरुन नेली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.ना. वणवे ९५५२५९१६२३ |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ३२९/१८,भादविक ३८७,४५२,५०४,३२३,५०६,११६,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-४५ वर्षे,रा.वडगांव-शेरी,पुणे |
| **आरोपी** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे जानेवारी २०१४ ते दि.१३/१०/२०१८ रोजीचे दरम्यान फिर्यादी यांचे राहते घरी व विमाननगर,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांनी त्यांचे फॅब्रिकेशनचे व्यवसायासाठी यातील नमुद इसमांकडुन ३७,०००००/- रूपये रक्कम ऊसनवारीने घेवुन,त्यांना दरमहा ६ टक्के व्याजदराने देण्याचे ठरवुन दिले होते. त्याप्रमाणे फिर्यादी यांनी त्यांना वेळोवेळी आरटीजीएस, चेकने व रोख स्वरुपात एकुण ५७,४६,०००/- रुपये त्यांना परत केलेले असतानादेखील,त्यांनी आपसात संगनमत करुन,फिर्यादी यांचे कामाचे ठिकाणी व त्यांचे राहते घरी जावुन,त्यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करुन,त्यांचे कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी देवुन,त्यांचेकडुन आणखी जादा १५ लाख रुपयेची खंडणीची मागणी करुन,त्यांचे मालकीचा फ्लॅटचे जबरदस्तीने नोटरी करुन घेतल्यानेटफिर्यादी यांनी सदर इसमांचे त्रासाला कंटाळुन,दि.१३/१०/२०१८ रोजी गोळया खावुन स्वतःचे जीवन संपविण्याचा प्रयत्न केलेला आहे. (फिर्यादी यांनी उपचार घेतल्यानंतर आज रोजी तक्रार दिली आहे.) |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे) रमेश साठे ९८२३३८५९९९ |

५

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विश्रांतवाडी पो स्टे ३१७/१८,भादविक ४२०,४०३,४०६,४६५,४६७,४६८,४७१,४७४,३४,१२०(ब), ४८९(सी)(डी) |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-५२,रा.टिंगरेनगर,पुणे |
| **आरोपी** | एकुण पाच ते सहा इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | माहे मे, जुन २०१७ ते आजपर्यंत पुणे, चैन्नई, त्रिवेंद्रम व अमराविले येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे बाधंकाम व्यवसाईक असुन,त्यांचे आळंदी रोड,येरवडा पुणे येथे ऑफीस आहे. फिर्यादी हे पिंपरी-चिंचवड,पुणे,अहमदनगर आणि कोल्हापुर येथे प्रोजेक्ट करीत आहेत. त्यांना कोल्हापुरचे प्रोजेक्टसाठी पैशांची गरज होती. त्याकरीता फिर्यादी व त्यांचे सहकारी यांनी कर्नाटका, तामिळनाडु आणि केरळ मधील गुंतवणुकदार यातील नमुद इसमांनी संगनमत करुन,फिर्यादी यांचे वेग-वेगळया बांधकाम प्रोजेक्टसाठी ६० कोटी कर्ज मिळवुन देण्याचे मान्य केले होते. त्याप्रमाणे फिर्यादी यांना ६० कोटीचे कर्ज मिळविण्यासाठी त्यांचे कंपनीला फिर्यादी यांचेकडुन ८० लाख रूपये मोबीलायझेशन आगाऊ रक्कम म्हणुन दिले असताना, त्यांनी सदर बाबत अमराविले येथील सब-रजिस्टर कार्यालयात २० हजार रूची नोंदणी फी भरून,फक्त १० लाखाची प्रोमेसरी नोट नोंदवुन,इतर तीन प्रॅमेसरी नोटची नोंदणी न करता,तसेच ६० लाखाचा डी.डी. न काढता,फिर्यादी यांचे ८० लाख रुपयेचा अपहार करुन त्यांची फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.निरी.(गुन्हे) अशोक सायकर |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**